जा.क्र.शिउसं/उ मा-४०५/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०२४-२०२५ | 11549
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक : 10 OCT 2024

प्रति,

अध्यक्ष/सचिव, कलर्स एज्युकेशनल सोसायटी, औध,जि. पुणे

विषय : सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे करिता परवानगी (इरादापत्र) देण्याबाबत.

संदर्भ : १. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा(स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र.१,६ व २४) २०१२
२ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मुंबई कडील .शासन निर्णय क्र. नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१ दि २०.६.२०१२
३. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मुंबई कडील शासन निर्णय क्रमांक एसएफएस-१०१८/प्र.क्र. १११६/एसएम-२ दिनांक ९.९.२०१९
४.शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मुंबई कडील शासन निर्णय क्रमांक एसएफएस-४७२१/प्र क्र ०३/एसएम-२, दि. १.४.२०२१
५. गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती,मुळशी, पौड (पुणे) यांचेकडील दिनांक ५.५.२०२२ रोजीचा तपासणी अहवाल
६ कलर्स एज्युकेशनल सोसायटी, औंध जि. पुणे यांचे पत्र दिनांक ३०.८.२०२२
७. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग एस एम-२ यांचेमार्फत २१.१०.२०२२ रोजीचा परवानगी आदेशाबाबत चा ईमेल संदेश
८.या कार्यालयाचे पत्र जा.क्र. शिउसं/प्राथ-२०४/इरादापत्र/पुवि/२०२२/११६५३,दि.१५.११.२०२२
९.शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद,पुणे यांचेकडील अहवाल जा.क्र. जि प/शिक्षण/प्राथ/खाप्राशा/१५५५/२०२३ दि.३०.८.२०२३
१०.या कार्यालयाचे पत्र जा.क्र.शिउसं/प्राथ-२०४/ज रा कु/मान्यता/पुवि/२०२३/११९७६, दिनांक २२.११.२०२३
११.कलर्स एज्युकेशनल सोसायटी मारुंजी पुणे यांचेकडील पत्र दिनांक २९.७.२०२४

वरील विषयी आपणासं कळविण्यांत येते की,आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष सन २०१९-२०२० मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरिता /विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र.३ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता सन २०१९-२०२० पासून खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे. तसेच संदर्भीय क्र. ४ नुसार निर्गमित झालेल्या शासन निर्णयात नमूद आहे की, ज्या शैक्षणिक संस्थांना सन २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षाकरिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नविन शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यांत आलेली आहे व अशा संस्थांव्दारे संचलित शाळांची शाळा सुरु करण्याची विहित अठरा महिन्यांची मुदत ही दिनांक १ जून २०२० ते ३१ मे २०२१ या कालावधी दरम्यान संपत आहे. **अशा शैक्षणिक संस्थांना सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षापासून नविन शाळेस विशेष बाब म्हणून याव्दारे मुदतवाढ देण्यांत येत आहे. या कार्यालयाने संदर्भ क्रमांक १० व्दारे भोगवटा प्रमाणपत्र व आराखडयाबाबत कळविलेल्या त्रुटींची पूर्तता संबंधित संस्थेने संदर्भ क्र. ११ व्दारे केलेली आहे.**

| शासन यादी अ.क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नांव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नांव व पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार,नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| - | पुणे | कलर्स एज्युकेशनल सोसायटी, औध,जि. पुणे | कलर्स इनोव्हेशन ॲकॅडमी, मारुंजी ता.मुळशी जि.पुणे | इंग्रजी | आय.जी.सी. एस.ई. नवीन शाळा | इ.१ ली ते इ.१० वी प्राथमिक ते माध्यमिक | संदर्भीय क्र.४चे शासन निर्णयात नमूद असलेनुसार २०२१-२०२२ |

**२.२ अटी व शर्ती:**

१.संस्थेने सदर प्रस्तावित शाळा शासन मंजूरीपूर्वीच सुरु केली नसल्याची शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे यांनी खात्री करावी. तथापि सदर शाळा शासन परवानगी घेण्यापूर्वीच सुरु केली असल्यास शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे यांनी सदर शाळेकडून रुपये एक लक्ष इतका दंड वसूल करुन त्याचा अहवाल या कार्यालयास व शासनास सादर करावा.तसेच संस्थेने सर्व्हे नं ३१/८ व ३१/१५ मधील दोन्ही जागा सलग असल्याबाबतचा नकाशा या कार्यालयाकडे सादर केलेला आहे.

२.सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदींचा व या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यांत येणा-या सर्व नियमांची/तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

३ शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम,२००९ मधील तरतुदींची पूर्तता करुन सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादापत्र) देण्यांत येत आहे.

Scanned with OKEN Scanner